तरुण भारत संवाद ■ बुधवार, २१ मे २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची प्लास्टिक विरोधी मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंदमधील अकरावी कला, वाणिज्य विभागातील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी जवळपास २०० किलो प्लास्टिकचा राक्षस बाटलीत बंद केला आहे. या मध्ये चॉकलेट, फास्ट रेडी फूडचे, प्लास्टिक पिशवी, स्ट्रॉ अशा बऱ्याच वस्तू आहेत. प्लास्टिक समस्या पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत असताना महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम सर्वांसाठी मार्गदर्शक आहे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. प्लास्टिकमुळे गटारे–प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, समुद्रतळाशी जाऊन तेथील जैवविविधता धोक्यात आणणे असे दुष्परिणाम होत आहेत. विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी 'प्लास्टिकचा राक्षस करा बाटलीत बंद' या उपक्रमांतर्गत कचरा गोळा केला आहे. प्लास्टिक हे पर्यावरणासाठी एक गंभीर धोका आहे. ते विघटन न होणारे असून हजारो वर्षे जमिनीत राहते. प्लास्टिकमुळे माती, पाणी आणि समुद्री जीवसृष्टीचे मोठे नुकसान होते. त्यामुळे प्लास्टिक वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्याय निवडणे ही काळाची गरज आहे. निसर्ग संपदेचे संवर्धन, नैसर्गिक स्तोत्रांचे जतन संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयाच्या माध्यमातून तरुणांना सहभागी करून घेण्याची गरज आहे. यासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. कुंभार, विभागप्रमुख प्रा. एस. एस. भोसले यांनी सहकार्य केले.

■ **प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन**

सकाळ TODAY
कोल्हापूर, बुधवार, २१ मे २०२५


# 'प्लास्टिकचा छंद, करा बाटलीत बंद'

## विवेकानंद ज्युनिअर कॉलेजमध्ये उपक्रम

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : प्लास्टिकमुळे गटारी व प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, पाणवठ्यांच्या तळाशी जाऊन जैवविविधता धोक्यात आणणे हे दुष्परिणाम दिसून येत आहेत. यावर उपाय म्हणून विवेकानंद ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण विभागामार्फत 'प्लास्टिकचा छंद, करा बाटलीत बंद!' हा उपक्रम राबविला. उपक्रमाद्वारे एकल वापर प्लास्टिक संकलन हाच उद्देश होता.

उपक्रमामध्ये ११ वी आर्टस् आणि कॉमर्समधील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी भाग घेऊन जवळपास २०० किलो प्लास्टिक बाटलीत बंद केले. यामध्ये चॉकलेट, फास्ट रेडी फूडचे कागद, प्लास्टिक पिशवी, स्ट्रॉ अशा बऱ्याच प्रकारच्या वस्तू आहेत.

सध्या एकल वापर प्लास्टिक पर्यावरणास घातक ठरत आहे. कारण ते पुनर्वापर करता येत नाहीत पुनर्चक्रीकरणही करणे दुरापास्त आहे, असे पर्यावरण आणि जलसुरक्षा विभागप्रमुख प्रा. अनिल धस यांनी सांगितले. उपक्रमास सचिव व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. पी. वाय. राठोड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : 'प्लास्टिकचा छंद.करा, बाटलीत बंद' उपक्रमांतर्गत तयार केलेली प्लास्टिकची भिंत.

> प्लास्टिक समस्या आज पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत असताना महाविद्यालयाने राबविलेला उपक्रम सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल.
>
> **- डॉ. आर. आर. कुंभार,** प्राचार्य

> प्लास्टिक विघटन न होणारे असून हजारो वर्षे जमिनीत राहते. प्लास्टिकमुळे माती, पाणी आणि समुद्री जीवसृष्टीचे नुकसान होत आहे. प्लास्टिक वापर कमी व पर्यावरणपूरक पर्याय निवडणे काळाची गरज आहे.
>
> **- प्रा. शिल्पा भोसले,** विभागप्रमुख